# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

## वैद्यकिय अधिकारी व विधी अधिकारी ही पदे मानधन तत्वावर भरण्याबाबत.

जाहिरात क्रमांक :- ५६/२०२४ दिनांकः- १५/०६/२०२४

<u>या जाहिरातीव्दारे भरावयाच्या पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.</u>

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | एकत्रित मानधन | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| ०१ | वैद्यकिय अधिकारी | २<br>(१ महिला व १ पुरूष) | रू. ३०,०००/- प्रति माहे | १. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा MBBS/BAMS समकक्ष पदवीधारक व भारतीय वैद्यकिय परिषद तर्फे नोंदणीकृत असावा.<br>२. मराठी, इंग्रजी व हिंदी भाषेचे ज्ञान असावे. |
| ०२ | विधी अधिकारी | १ | रू. ५०,०००/- प्रति माहे | १. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर व तो भारतीय विधी परिषद तर्फे नोंदणीकृत व सनद धारक असावा.<br>२. विधी अधिकारी अथवा समकक्ष पदाचा ५ वर्षाचा अनुभव असावा.<br>मराठी, इंग्रजी व हिंदी या भाषावर प्रभुत्व आणि विधी संबंधी लेखन कौशल्य आवश्यक. |

## अर्जदारांसाठी सर्वसाधारण सूचना

उमेदवारांनी आपले अर्ज भरण्याआधी व पाठविण्यापूर्वी त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव ईत्यादी वरील बाबी पडताळून पाहाव्यात तसेच खालील **सूचना व अटींचे लक्षपूर्वक वाचन करावे.**

१. सदर जाहिरातीतील पदसंख्या, निवड प्रक्रिया व नेमणुका ह्या विद्यापीठाच्या अधिनस्त राहतील.
२. सदर नियुक्ती केवळ तात्पुरत्या(कंत्राटी) स्वरूपात ११ महिण्याच्या कालावधीकरीता राहील. ११ महिणे कालावधीनंतर सदर नियुक्ती आपोआप संपूष्टात येईल. उमेदवारास सदर पदावर कायम करण्याबाबत दावा करता येणार नाही.
३. सदर जाहिरातीतील अटी व शर्तीमध्ये आवश्यकतेनुसार फेरबदल करण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवले आहेत.
४. सदर जाहिरातीतील पदांसाठी छाननीअंती पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची निवड मुलाखतीअंती करण्यात येईल.
५. सर्व पदांसाठी अर्जदारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
६. उमेदवारांसाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे पुर्ण असावी. सेवानिवृत्त कर्मचारी यांचेकरीता वयाची अट लागू नाही.
७. उमेदवारांनी विद्यापीठाच्या http://www.unigug.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहीत नमुन्यामध्येच टंकलिखीत, हस्तलिखीत किंवा संगणकिय प्रिंट केलेला अर्ज (संपूर्ण कागदपत्रांसह) सादर करावा. विहित नमुन्यातील अनुक्रमांकामध्ये/रकान्यामध्ये कुठलाही बदल करून नये. अर्ज भरतांना रकाने किंवा ओळी कमी पडत असल्यास अधिकची माहिती स्वतंत्र कागदावर द्यावी व तसे अर्जात योग्य त्या ठिकाणी नमूद करावे.
८. अर्जदाराने अर्जाच्या विहीत नमुन्यात दर्शविलेल्या स्थानी **स्वतःचा स्वसाक्षांकित केलेला फोटो** लावावा.

९. उमेदवार हा शारिरीक दृष्ट्या सक्षम असावा तसेच अर्जदाराविरूध्द कोणत्याही फौजदारी गुन्ह्याची नोंद नसावी. तसे आढळल्यास नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१०. अर्जाच्या छाननी अंती अर्जदार अपात्र ठरल्यास याबाबतची माहिती संबंधीत अर्जदारास स्वंतत्ररित्या कळविली जाणार नाही.

११. अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, अनुभव, इत्यादी आवश्यक व लागू असलेल्या प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित/स्वक्षांकित करून अर्जासोबत जोडाव्यात. अर्जासोबत मुळ प्रमाणपत्रे जोडू नयेत.

१२. पदासाठी केलेला अर्ज लिफाफ्यात भरून "------------------------------------ **या पदासाठी अर्ज"** असे लिफाफ्यावर लिहून **दिनांक ०१/०७/२०२४ रोजी सायंकाळी ५.३० पर्यंत कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, एम.आय.डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली ता. जि. गडचिरोली पिन ४४२६०५** यांच्याकडे उपरोक्त नमूद केलेल्या तारखेपर्यंत प्राप्त होणे आवश्यक आहे.

१३. अर्ज सादर करण्याच्या अंतिम तारेखपर्यंतच म्हणजेच दिनांक **०१/०७/२०२४** रोजी सायंकाळी ५.३० वाजपर्यंत सादर करावयाचे आहे. उपरोक्त मुदतीत प्राप्त न झालेले अर्ज रद्दबातल ठरविण्यात येतील.

१४. सुवाच्य अक्षरात नसलेले, अपूर्ण, चुकीची माहिती भरलेले, विहित नमुन्यात नसलेले, आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करीत नसलेले, प्रमाणपत्रांच्या छायांकित, साक्षांकित/स्वक्षांकित नसलेल्या प्रती न जोडलेले अर्ज, टपालखात्याच्या दिरंगामुळे अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव उशीरा प्राप्त झालेले, इत्यादी त्रुटी असलेले अर्ज तसेच सर्व प्रमाणपत्रासह नसलेले अर्ज नाकारण्यात येतील व त्याबाबतचा कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**१५. अर्जदाराची शैक्षणिक पात्रता, अनुभव अर्ज सादर करण्याच्या अंतिम तारखेपर्यंत ग्राह्य धरण्यात येईल.**

१६. अर्जाच्या छाननीअंती अर्जदार अपात्र ठरल्यास याबाबतची माहिती संबंधीत अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविली जाणार नाही.

१७. उमेदवारांनी भरती प्रक्रियेत विद्यापीठाशी संबंधीत अधिकारी व कर्मचाऱ्यावर कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दडपण तथा राजकिय किंवा सामाजिक दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अथवा अप्रत्यक्ष संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्यास, अशा उमेदवारास अपात्र समजले जाईल.

१८. मुलाखतीस बोलाविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१९. विद्यापीठ प्रशासनाव्दारे आयोजित मुलाखतीस पाचारण करण्यात येणाऱ्या संबंधीत उमेदवाराची ठराविक दिवशी प्रशासनाच्या कोणत्याही अडचणीमुळे मुलाखत पार न पडल्यास अशा संबंधीत उमेदवारांची प्रशासनाच्या निर्देशान्वये इतर दिवशी मुलाखत आयोजित करण्यात येईल व त्याकरीता मुलाखतीस संबंधीत उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

२०. निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीउपरांत उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे सादर केल्याचे किंवा माहिती लपवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची निवड/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल व तो उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र होईल.

२१. अर्जदाराला अर्जामध्ये दिलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यात बदल करावयाचा असल्यास याबाबत उपकुलसचिव, आस्थापना विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, एम.आय.डी.सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली ता.जि. गडचिरोली पिन ४४२६०५ यांना त्वरीत कळवावे लागेल.

२२. ई-मेल किंवा फॅक्सव्दारे प्राप्त झालेले अर्ज रद्द समजण्यात येतील.

२३. पदांच्या संख्येत वाढ किंवा घट झाल्यास, रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याबाबत, जाहिरातीत बदल किंवा दुरूस्ती करण्याबाबत, तसेच संपूर्ण जाहिरात रद्द करण्याबाबतचे अधिकार गोंडवाना विद्यापीठ, प्रशासनाने राखून ठेवले आहे.

२४.सेवा शर्तीनुसार अपात्र ठरलेल्या उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वगळण्यात येईल. याबाबतचा पत्रव्यवहार करणे बंधनकारक राहणार नाही.

२५. उमेदवारांना मुलाखतीकरीता कोणत्याही प्रकारचा प्रवास व इतर भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

**दिनांक :-** १५/०६/२०२४
**ठिकाण:-** गडचिरोली.

**(डॉ. अनिल हिरेखण)**
**कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**